# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./आयसीडी/२०२२-२३/५४

गोपनीय

व्यवस्थापन परिषद

क्र.१/२०२२-२३

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२२-२३ मधील १९ मे, २०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची पहिली सभा गुरूवार, **दिनांक १९ मे, २०२२ रोजी दुपारी २.३० वाजता** आभासी पध्दतीने आयोजित करण्यात आली.

**स्वागत :-** सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु.क्र. | मा. सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/अनुपस्थित |
|---|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष | उपस्थित |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य | उपस्थित |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य | अनुपस्थित |
| ४. | प्रा. राजेश खरात | सदस्य | अनुपस्थित |
| ५. | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य | उपस्थित |
| ६. | प्रा. अजय भामरे | सदस्य | अनुपस्थित |
| ७. | प्रा. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य | उपस्थित |
| ८. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य | अनुपस्थित |
| ९. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य | अनुपस्थित |
| १०. | ॲड. निल हेळेकर | सदस्य | उपस्थित |
| ११. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य | उपपस्थित |
| १२. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य | अनुपस्थित |
| १३. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य | उपस्थित |
| १४. | डॉ. बी.एन. जगताप | सदस्य | अनुपस्थित |
| १५. | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| १६. | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १७. | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १८. | श्री. सुधीर पुराणिक (कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १९. | डॉ. विनोद पाटील (संचालक,प. व मु. मं.) | निमंत्रित | उपस्थित |
| २०. | डॉ. प्रदीप कामथेकर (वि व ले. अधिकारी) | निमंत्रित | उपस्थित |

➢ **अनुपस्थिती :-** डॉ. वैभव नरवडे यांनी सदर सभा प्रत्यक्ष घेत नसल्याचा निषेध व्यक्त करुन ऑनलाईन सभात्याग केला.

➢ **श्रध्दांजली :-**

**श्री. नरेन परचुरे**

'परचुरे प्रकाशन' या सर्वात जुन्या आणि नामांकित प्रकाशन संस्थेचे संचालक श्री. नरेन परचुरे यांचे अल्पशा आजाराने दिनांक १५ एप्रिल, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५२ वर्षाचे होते.

**श्री. के. शंकरनारायण**

महाराष्ट्राचे माजी राज्यपाल आणि केरळचे माजी मंत्री के. शंकरनारायण यांचे प्रदीर्घ आजाराने दिनांक २४ एप्रिल, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षाचे होते.

**डॉ. माधव गोडबोले**

माजी केंद्रीय गृहसचिव डॉ. माधव गोडबोले यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक २५ एप्रिल, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षाचे होत

**श्रीमती. प्रेमा किरण**

मराठी चित्रपटसृष्टी आणि रंगभूमीवरील ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती. प्रेमा किरण यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ०१ मे, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६१ वर्षाच्या होत्या.

**श्रीमती. रजनी परूळेकर**

ज्येष्ठ कवयित्री श्रीमती. रजनी परूळेकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक ०५ मे, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७७ वर्षाच्या होत्या.

**श्री. म. ना. गोगटे**

मराठी विज्ञान परिषदेचे संस्थापक आणि माजी अध्यक्ष श्री. मधुकर नारायण गोगटे यांचे वृध्दपकाळाने दिनांक ७ मे, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षाचे होते.

**पं. शिवकुमार शर्मा**

संतूरवाद्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा मिळवून देणारे जगविख्यात संतूरवादक पंडित शिवकुमार शर्मा यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १० मे, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षाचे होते.

**श्री. रमेश लटके**

अंधेरी पूर्व मतदारसंघातील शिवसेनेचे आमदार श्री. रमेश लटके यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १२ मे, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५२ वर्षाचे होते.

**श्रीमती. संजीवनी करंदीकर**

ज्येष्ठ समाजसुधारक प्रबोधनकार ठाकरे यांची कन्या आणि शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या भगिनी श्रीमती. संजीवनी करंदीकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक १३ मे, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८४ वर्षाच्या होत्या.

**श्री. एच. एम. दलवाई**

माजी मंत्री, माजी लोकसभा व राज्यसभेचे खासदार श्री. एच. एम. दलवाई यांचे वृध्दपकाळाने दिनांक १२ मे, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९९ वर्षाचे होते.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | दि. २९ मार्च, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | का.प्रा.वि. |
| ठराव | दि. २९ मार्च, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. २ | व्यवस्थापन परिषद दिनांक ६ मार्च, २०२२ चा कार्यवाही अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | का.प्रा.वि. |
| ठराव | व्यवस्थापन परिषद दिनांक ६ मार्च, २०२२ चा कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |
| बाब क्र. ३ | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी इरादापत्र प्राप्त केलेल्या संस्थेच्या अंतिम मान्यतेसाठी तज्ञ समितीचा प्राप्त अहवाल ही बाब व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २९ जुलै, २०२१ रोजी बाब क्र. १५ अन्वये मंजूर करण्यात आली मात्र सदरच्या ठरावात काही बदल करून देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेपुढे मान्यतेस्तव सादर. | म. संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी इरादापत्र प्राप्त केलेल्या संस्थेच्या अंतिम मान्यतेसाठी तज्ञ समितीचा प्राप्त अहवाल ही बाब व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २९ जुलै, २०२१ रोजी बाब क्र. १५ अन्वये मंजूर करण्यात आली मात्र सदरच्या ठरावात पुढीलप्रमाणे बदल करण्यास मान्यता देण्यात आली.<br>"शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून नवीन महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी) सुरु करण्याकरता शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क. मान्यता -२०१९/(२४९/१९) माशी -४, दिनांक ३१ जानेवारी, २०२० नुसार ईरादापत्र प्राप्त केलेल्या २५ संस्थेच्या प्रस्तावित महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधा तपासण्याकरिता गठित केलेल्या तज्ञ समितीचे अहवाल, अधिष्ठाता मंडळाचे अभिप्राय व अपात्र प्रस्तावावरील अपिलांवर कुलगुरूंच्या सुनावणीनंतर निर्णय या सर्वांचे अवलोकन करून | |

| | | |
|---|---|---|
| | २२ संस्थांचे प्रस्ताव 'परिशिष्ट-अ' प्रमाणे शासनाकडे पाठविण्याची शिफारस करण्यात आली. (परिशिष्ट-अ) सोबत जोडले आहे.<br>परिशिष्ट-अ मधील क्र. ०५, ०७, १७ अपात्र करण्यात आले व ते प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येऊ नये, असे ठरले."<br>**च्याऐवजी असे वाचावे**<br>"शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून नवीन महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी) सुरु करण्याकरता शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. एनजीसी-२०२१/(१/२१) मशि-४, दिनांक १५ एप्रिल, २०२१ आणि क्र. एनजीसी-२०२१/(१/२१) मशि-४, दिनांक १७ मे, २०२१ नुसार ईरादापत्र प्राप्त केलेल्या २५ संस्थेच्या प्रस्तावित महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधा तपासण्याकरिता गठित केलेल्या तज्ञ समितीचे अहवाल, अधिष्ठाता मंडळाचे अभिप्राय व अपात्र प्रस्तावावरील अपिलांवर कुलगुरूंच्या सुनावणीनंतर निर्णय या सर्वांचे अवलोकन करून २२ संस्थांचे प्रस्ताव 'परिशिष्ट-अ' प्रमाणे शासनाकडे पाठविण्याची शिफारस करण्यात आली. (परिशिष्ट-अ) सोबत जोडले आहे.<br>परिशिष्ट-अ मधील क्र. ०५, ०७, १७ अपात्र करण्यात आले व ते प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येऊ नये, असे ठरले." | |
| बाब क्र.४ | सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे, यादवराव तासगांवकर कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट आणि यादवराव तासगांवकर कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी या महाविद्यालयाच्या प्रशासनाकडून अन्याय होत असल्याने विद्यार्थी व कर्मचा-यांच्या दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजीच्या तक्रारीबाबत. | म. संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे यादवराव तासगांवकर कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट आणि यादवराव तासगांवकर कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी या महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने विद्यापीठाच्या कारणे दाखवा नोटीसीला दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली. अंतिमत: सर्वानुमते असा निर्णय घेणयात आला की, विद्यापीठाच्या पॅनलमधील एक वकिल निवडून त्यांच्या | |

| | | |
|---|---|---|
| | सल्ल्याने सदर व्यवस्थापनावर फौजदारी खटला दाखल करावा. त्याचवेळी, सदर संस्थेला रु.१ कोटींचा दंड आकारावा व त्यांनी तो एक महिन्याच्या कालावधीत भरावा. सदर दंडाचा विनियोग करण्याची कार्यपद्धती नंतर ठरविण्यात येईल, मात्र त्याचा वापर त्रस्त प्राध्यापक व इतर व्यक्तींसाठी केला जाईल.<br>तसेच या सर्व प्रकरणाचा संक्षिप्त इतिहास माननीय राज्यपाल यांना कळवून विनंती करावी की या संस्थेचे, स्वत:ची काही महाविद्यालये बंद करुन इतर नवीन महाविद्यालये सुरु करण्याचे, मनसुबे असल्यास त्या-त्या मान्यता प्राधिकरणांना/ विद्यापीठांना त्याप्रमाणे कळवून त्यांच्या मान्यता रोखाव्यात. तसेच मुंबई विद्यापीठानेही सर्व विद्यापीठांना संस्थेच्या संक्षिप्त इतिहास व त्यांच्यावर केलेल्या कारवाईबाबत कळवावे. तसेच प्रसारमाध्यमांमध्येही प्रसिध्द करावे असे ठरले. | |
| बाब क्र.५ | डीन ॲण्ड हेड ऑफ डिपार्टमेंट, डिपार्टमेंट ऑफ बॉयोकेमिस्ट्री, सेठ जी. एस. मेडिकल कॉलेज ॲण्ड के.ई.एम. हॉस्पीटल, परेल, मुंबई या महाविद्यालयाने एम.एस्सी. बायोकेमिस्ट्री (बाय पेपर) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या वर्षापासून बंद करण्यासाठीचा स्थानिक चौकशी समितीचा अहवाल. | म. संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | डीन ॲण्ड हेड ऑफ डिपार्टमेंट, डिपार्टमेंट ऑफ बॉयोकेमिस्ट्री, सेठ जी. एस. मेडिकल कॉलेज ॲण्ड के. ई. एम. हॉस्पीटल, परेल, मुंबई या महाविद्यालयाने एम. एस्सी. बायोकेमिस्ट्री (बाय पेपर) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२०-२१ यावर्षापासून बंद करण्यासाठीच्या स्थानिक चौकशी समितीच्या अहवालास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र.६ | अस्थायी वाहनचालकांना गणवेशांतर्गत वस्तू मिळण्याबाबत. | फो. प्र. विभाग |
| ठराव | आवश्यक ती कार्यपध्दती अवलंबून अस्थायी वाहनचालकांना गणवेशांतर्गत वस्तू देण्यास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र.७ | आचार्य श्री. महाश्रमण चातुर्मास सेवा ट्रस्ट, मुंबई यांना विद्यानगरी परिसरातील जागा वापरण्याकरीता परवानगी मिळण्याबाबत. | वि. प्र. विभाग |

| | | |
|---|---|---|
| ठराव | आचार्य श्री. महाश्रमण चातुर्मास सेवा ट्रस्ट, मुंबई यांना विद्यानगरी परिसरातील २० एकर जागा व्याख्यानासाठी माहे जुलै, २०२३ ते ऑक्टोबर, २०२३ दरम्यान वापरण्याकरीता परवानगी देण्याबाबतच्या प्रस्तावावर सभागृहात चर्चा झाली. चर्चेअंती असे ठरले की, मा. कुलसचिवांनी आचार्य श्री. महाश्रमण चातुर्मास सेवा ट्रस्ट, या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना पत्राने कळवावे की, विद्यमान कुलगुरु यांचा कार्यकाळ १० सप्टेंबर, २०२२ रोजी व व्यवस्थापन परिषद यांचा कार्यकाळ ३१ ऑगस्ट, २०२२ रोजी संपुष्टात येत आहे, त्यामुळे यानंतर येणारे पुढील कुलगुरु व व्यवस्थापन परिषद यांच्या समोर त्यांनी आपला सदर प्रस्ताव मांडावा. | |
| बाब क्र.८ | विद्यापीठातील केंद्रीय संगणक विभाग (सी.सी.एफ.) मधील कार्यरत असलेल्या सिनिअर सिस्टिम प्रोग्रामर या पदांना रू.३७४००-६७००० व ग्रेड पे रू. ८७०० ही वेतनश्रेणी लागू करण्याबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | विद्यापीठातील केंद्रीय संगणक विभाग (सी.सी.एफ.) मधील कार्यरत असलेल्या सिनिअर सिस्टिम प्रोग्रामर या पदांना रू.३७४००-६७००० व ग्रेड पे रू. ८७०० ही वेतनश्रेणी लागू करण्याबाबत गठीत करण्यात आलेल्या ॲड. नील हेळेकर समितीने सदर वेतनश्रेणी लागू करता येणार नाही असा अहवाल दिलेला असून सदर अहवालास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र.९ | विद्यापीठाच्या नवसंशोधन केंद्राकरीता (Incubation Centre) मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) हे पद विशिष्ट कालावधीकरीता निर्माण करणे तसेच सदर पद हंगामी स्वरूपात भरण्याकारीता शैक्षणिक अर्हता, मानधन इत्यादि ठरविणे. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ८(२)(घ)(एक) व कलम ३१(ब) नुसार व्यवस्थापन परिषदेस असलेल्या अधिकारांतर्गत विद्यापीठाच्या नवसंशोधन केंद्राकरीता (Incubation Centre) मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) हे पद कंत्राटी तत्वावर भरतीसाठी ३ वर्षांकरिता पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून भरण्यास मंजूरी देण्यात आली. | |

| | | |
|---|---|---|
| | लक्ष) प्रतीमाह इतक्या एकत्रित वेतनावर कंत्राटी/हंगामी पध्दतीने भरण्यात यावे.<br>२. या पदावरील कर्मचाऱ्यास शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.<br>३. कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करावयाच्या CEO या पदाची शैक्षणिक अर्हता, अनुभव, कर्तव्ये व जबाबदा-या सोबत जोडलेल्या परिशिष्ठ-अ प्रमाणे राहील.<br>४. कंत्राटी पध्दतीने सदर पद भरण्याकरीता निवड समिती गठीत करुन वृत्तपत्रांत जाहिरात देऊन विहित पध्दतीने भरतीप्रक्रीया राबविण्यात यावी.<br>५. सदर नेमणूक ही करार पध्दतीने प्रथमतः ११ महिन्यांसाठी करण्यात यावी. तद्नंतर आवश्यकतेनुसार पद अस्तित्वात असेपर्यंत वेळोवेळी मुदत वाढविता येईल.<br>६. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्याकडून आवश्यक अटी व शर्ती अंतर्भुत करुन करारनामा करुन घेण्यात यावा.<br>७. कंपनी कायदयांतर्गत असलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे त्यांच्या स्वयंमुल्यमापनाची पध्दती ठरवावी. सदर ठराव संचालक मंडळ यांना पाठवावा. मासिक मानधनाच्या अंदाजे ३० % ते ४० % प्रोत्साहन भत्ता त्यांच्या दर सहा महिन्याच्या कामगिरीनुसार ठरविण्यात यावा.<br>चर्चेच्या अनुषंगाने असेही ठरविण्यात आले की, संचालक मंडळामध्ये अजून दोन/तीन कंपन्यांचे संचालक नियुक्त करावे व त्यांच्या नियुक्तीचे अधिकार मा. प्र-कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. | |
| बाब क्र. १० | विद्यापीठातील शिक्षकेत्तर स्थायी कर्मचा-यांसाठी २०२२-२३ या वर्षामध्ये “वैद्यकीय गट विमा योजना” कार्यान्वित करण्याबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | विद्यापीठातील शिक्षकेत्तर स्थायी कर्मचा-यांसाठी २०२२-२३ या वर्षामध्ये “वैद्यकीय गट विमा योजना” कार्यान्वित करण्यात आली असून त्यास कार्योत्तर करण्यास मान्यता देण्यात आली. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | त्याचवेळी सदर मुद्दयाबाबत प्रदिर्घ चर्चा झाली. वित्त व लेखा अधिकारी यांनी सदर बाबत अधिकची माहिती देताना सांगितले की, असे ठरले आहे की, प्रत्येक कर्मचा-याचे दर महिना कापलेले रू. ४००/- हे कुलगुरू फंडात जमा न करता ते वेगळया खात्यात जमा करावेत व विद्यापीठ जेव्हा विमा कंपनीला पैसे देईल तेव्हा हे पैसे त्यात वळते करून उरलेला भार विद्यापीठ उचलेल, ज्यामुळे आता कर्मचा-यांना केवळ वैदयकीय गट विमा योजनेअंतर्गत वैदयकीय बिलांचा परतावा मिळेल, कुलगुरू फंडातून इतर कुटूंबियांसाठी ते मदत मागू शकणार नाहीत. सदर निर्णय सर्व लाभधारकांना तात्काळ मा. कुलसचिवांच्या मार्फत कळविण्यात यावा असे मा. कुलगुरूंनी निर्देश दिले.<br>तसेच ॲड. निल हेळेकर यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, यापूर्वी विद्यापीठाच्या सर्व कर्मचा-यांना रू.३०००/- दरवर्षी वैदयकीय भत्ता देण्यात येत असे. मात्र आता ज्या कर्मचा-यांनी सदर विमा योजनेचा स्विकार केलेला नाही, त्यांना मात्र विद्यापीठ कोणताही वैदयकीय भत्ता देत नाही व ज्यांनी विमा योजना स्विकारली आहे त्यांची प्रत्येकी रू.१४,०२१/- एवढी रक्कम विद्यापीठ विमा कंपनीला देते. यावर मा. कुलगुरूंनी सदरबाबत सर्व कर्मचा-यांना समान न्याय मिळण्यासाठी सदर योजना केव्हापासून सुरू आहे, किती जणांनी ती स्विकारलेली नाही याची माहिती घेऊन पुढील सभेपुढे सादर करावयाचे निर्देश दिले व ज्यांनी सदर योजना स्विकारलेली नाही त्यांच्यासंदर्भात काय करावयाचे व सदर वैद्यकीय गट विमा योजना यापुढे राबविण्याबाबत निर्णय पुढील बैठकीत घेण्याचे ठरविले. | |
| बाब क्र. ११ | विद्यापीठाच्या पायाभूत सुविधा नियोजन, अंमलबजावणी व देखभाल विभाग येथे कनिष्ठ अभियंता (०८ पदे) विशिष्ट कालावधीकरीता निर्माण करणे तसेच सदर पदे हंगामी स्वरूपात भरण्याकरीता शैक्षणिक अर्हता व मानधन ठरविणे. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील ८(२) (घ) (एक) व कलम ३१ (ब) नुसार | |

| | | |
|---|---|---|
| | व्यवस्थापन परिषदेस असलेल्या अधिकारांतर्गत विद्यापीठाच्या पायाभूत सुविधा नियोजन, अंमलबजावणी व देखभाल विभाग येथे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)-०६ पदे व कनिष्ठ अभियंता (विद्युत)-०२ पदे कंत्राटी तत्वावर भरतीसाठी ३ वर्षांकरीता पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून निर्माण करण्यास मंजूरी देण्यात आली.<br>१. सदर पदे नियमित वेतनश्रेणीत न भरता रु.४०,०००/- प्रतीमाह इतक्या एकत्रित वेतनावर कंत्राटी/ हंगामी पध्दतीने भरण्यात यावीत.<br>२. या पदावरील कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.<br>३. कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करावयाच्या पदांची शैक्षणिक अर्हता व अनुभव सोबत जोडलेल्या 'परिशिष्ठ-ब' प्रमाणे राहतील.<br>४. कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांसाठी निवड समिती गठीत करुन वृत्तपत्रांत जाहिरात देऊन विहित पध्दतीने भरतीप्रक्रिया राबविण्यात यावी.<br>५. सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांसाठी करण्यात याव्यात. तद्नंतर आवश्यकतेनुसार पुढील ३ वर्षे वेळोवेळी ११ महिन्यांसाठी मुदत वाढविता येईल.<br>६. सदर नेमणुकांचे ११ महिन्यांनंतर स्वयंमुल्यांकन करून त्यांचा अहवाल समाधानकारक असेल तरच पुढील ११ महिन्यांची नेमणूक करावी, अन्यथा करू नये.<br>७. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांकडून आवश्यक अटी व शर्ती अंतर्भुत करुन करारनामा करुन घेण्यात यावा. | |
| बाब क्र. १२ | विद्यापीठातील वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ मधील अधिकारी/कर्मचा-यांनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजीनंतर पी.एच.डी. पदवी प्राप्त केली असेल अशा सर्व अधिकारी/कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |

| | | |
|---|---|---|
| ठराव | विद्यापीठातील वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ मधील अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजीनंतर पी.एच.डी. पदवी प्राप्त केली असेल व यापुढे करतील अशा सर्व अधिकारी/कर्मचारी यांना रू. १०,०००/- असा एक रक्कमी प्रोत्साहन भत्ता देण्यास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. १३ | Implementing MYBYK (Bicycle Share) Scheme in Vidyanagari Campus, University of Mumbai. | पा.सु.नि. अं. व दे. वि. |
| ठराव | MYBYK योजना मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात राबवण्यासंदर्भात ॲड. नील हेळेकर, श्री. प्रदिप सावंत, श्री. रविकांत सांगुर्डे हयांच्या समितीने दिलेल्या अहवालास सर्वांनुमते मंजुरी देण्यात आली व त्यांनी दिलेल्या सुचनांचा अंतर्भाव करून MYBYK बरोबर करार करावा असे ठरले. मात्र MOU चा मसुदा MOU समितीकडून प्रथम तपासून घ्यावा व नंतरच करार करावा असे ठरले. | |
| बाब क्र. १४ | Regarding Pending dues from more than three years of M/s Shiv Enterprises against their works providing street light poles LED street light fittings cables etc. at various places at Vidyanagari Campus, University of Mumbai. | पा.सु.नि. अं. व दे. वि. |
| ठराव | मेसर्स शिव इंटरप्रायजेस् यांच्या थकीत बिलाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा झाली. सदर बाब २०१८ मधील असून ६ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर येऊन आता पुन:श्च निर्णयासाठी आल्याचे मा. कुलगुरुंनी सांगितले. चर्चेअंती, सदर देयकानुसार किती लाईटस् बसवले, कुठे व कोणत्या दराने बसवले, मुळ निविदेची रक्कम किती होती, इ. गोष्टींची सविस्तर माहिती विद्यापीठ अभियंता श्री. विनोद पाटील यांच्याकडून घेण्याचे निर्देश मा. कुलसचिवांना देण्यात आले. अंतिमत: विद्यापीठ अभियंता श्री. विनोद पाटील यांना खालील मुद्दयांचा समावेश करुन तात्काळ पत्र देणेबाबत मा. कुलगुरुंनी कुलसचिवांना निर्देश दिले.<br>१) सदर खर्च तूम्ही फोर्ट विभागात विद्यापीठ अभियंता असतेवेळीचा असून हा खर्च का केला गेला होता? | |

| | | |
|---|---|---|
| | २) खर्चाची आगाऊ मंजूरी घेतली होती का?<br>३) नियमानुसार निविदा प्रक्रिया राबवली होती का ? असल्यास सर्व कागदपत्रे सादर करणे.<br>४) सदर बाब इमारत बांधकाम समिती (BWC) मध्ये कार्योत्तर मंजूरीस का आली? काम करण्याआधी परवानगी का नाही घेतली?<br>५) इमारत बांधकाम समिती (BWC) मध्ये सदर बाबत कार्योत्तर मंजूरी घेतल्यानंतर लगेचच्याच व्यवस्थापन परिषदेमध्ये सदर बाब का नाही ठेवली गेली?<br>६) खरेदी केलेल्या सर्व उपकरणांची सद्यस्थिती काय आहे?<br>या सगळया त्रुटींबाबत आपणांस जबाबदार धरण्यात येत आहे व त्यानुसार तुमच्यावर कारवाई का करण्यात येऊ नये याचे चार आठवडयात लेखी उत्तर द्यावे. लेखी उत्तर न दिल्यास झालेल्या दिरंगाईला तूम्ही जबाबदार आहात असे तूम्ही मान्य करता असे गृहीत धरुन पुढील योग्य ती कारवाई विद्यापीठ प्रशासन करेल. | |
| बाब क्र. १५ | राज्याच्या पर्यटन विभागामार्फत आपल्या अधिनस्थ असलेल्या फोर्ट, मुंबई येथील विद्यापीठाच्या इमारतीवर विद्युतरोषणाई करणेबाबत आलेला प्रस्ताव विचारार्थ सादर. | पा.सु.नि. अं. व दे. वि. |
| ठराव | राज्याच्या पर्यटन विभागामार्फत आपल्या अधिनस्थ असलेल्या फोर्ट, मुंबई येथील विद्यापीठाच्या दिक्षांत सभागृह व मुख्य इमारतीवर विद्युतरोषणाई करणेबाबतच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली. मात्र मान्यता देताना या ऐतिहासिक वास्तूंचे काम करताना त्यांना कोणत्याही प्रकारची बाधा होणार नाही, शासनाच्या पुरातत्व व संवर्धन विभागाच्या अटी/शर्तींचे पालन केले जाईल, विद्युत रोषणाईचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर वास्तुची मालकी मुंबई विद्यापीठाचीच राहील, या सर्व गोष्टी त्यांनी मान्य करण्याच्या अटींच्या अधीन राहून त्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले. | |
| बाब क्र. १६ | To offer the following enlisted Certificate, Diploma, Advanced Diploma and PG Diploma Course through Distance Mode and Online Mode, in institute of Distance and Open Learning (IDOL) from academic year | दूर व मुक्त अध्ययन संस्था |

| | | |
|---|---|---|
| | 2021-22 onwards:<br>1. Certificate course in Basic of Module LMS<br>2. Bridge Course in Accounting<br>3. An Online Certificate Course in 'Geo in formatics for Earth Sciences and Natural Resource Management.'<br>4. Certificate Course in Reporting Elections in India<br>5. Certificate Course in Film Business and Marketing.<br>6. अमराठी भाषिकांसाठी मराठी भाषा शिक्षण प्रमाणपत्र<br>7. Certificate Course in Documentary Film Making.<br>8. PG Diploma Course in Advertising, Communication and Management<br>9. Certificate, Diploma and Advanced Diploma Course in Tourism and Travel Management.<br>10. An online certificate course in 'Corporate Social Responsibility' | |
| ठराव | It was resolved that the following enlisted Certificate, Diploma, Advanced Diploma and PG Diploma Course through Distance Mode and Online Mode, in institute of Distance and Open Learning (IDOL) from academic year 2021-22 onwards be accepted.<br>1. Certificate course in Basic of Module LMS<br>2. Bridge Course in Accounting<br>3. An Online Certificate Course in 'Geo in formatics for Earth Sciences and Natural Resource Management.'<br>4. Certificate Course in Reporting Elections in India<br>5. Certificate Course in Film Business and Marketing.<br>६. अमराठी भाषिकांसाठी मराठी भाषा शिक्षण प्रमाणपत्र<br>7. Certificate Course in Documentary Film Making.<br>8. PG Diploma Course in Advertising, Communication and Management<br>9. Certificate, Diploma and Advanced Diploma Course in Tourism and Travel Management.<br>10. An online certificate course in 'Corporate Social Responsibility' | |
| बाब क्र. १७ | Request for a modification in the Ordinance No. 0.2316 for M.COM & the Ordinance No. 0.2260 for M.A. & Ordinance No. 0.2462 for M.Sc. | दू. व मु. अ. संस्था |

| | | |
|---|---|---|
| ठराव | It was resolved that the request for a modification in the Ordinance No. 0.2316 for M.COM & the Ordinance No. 0.2260 for M.A. & Ordinance No. 0.2462 for M.Sc. be accepted. | |
| बाब क्र. १८ | (1) Intellectual Property Rights Policy (IPR) (2) Start-up and innovation policy for the University of Mumbai accepted by the Board of Innovation, Incubation and Enterprises meeting is kept for consideration of Management Council. | न. न. व साहचार्य |
| ठराव | It was resolved that (1) Intellectual Property Rights Policy (IPR) (2) Start-up and innovation policy for the University of Mumbai accepted by the Board of Innovation, Incubation and Enterprises meeting be accepted. | |
| बाब क्र. १९ | To read and approve the minutes of Finance and Accounts Committee meeting held on 11th May, 2022. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | वित्त व लेखा समितीच्या दिनांक ११ मे, २०२२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. २० | मुंबई विद्यापीठातील विद्यानगरी परिसरातील अस्तित्वात असलेले शिक्षक व शिक्षकेत्तर निवासी संकुल सदनिके-संदर्भातील अटी व नियमावली यास मान्यता मिळणेबाबत. | वि. प्र. विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठातील विद्यानगरी परिसरातील अस्तित्वात असलेले शिक्षक व शिक्षकेत्तर निवासी संकुल सदनिके-संदर्भातील ॲड. नील हेळेकर यांच्या समितीने तयार केलेल्या अटी व नियमावलीच्या अहवालास मान्यता देण्यात आली. | |
| | **आयत्यावेळी आलेली बाब** | |
| बाब क्र. २१ ठराव | मा. कुलगुरुंनी सभागृहास अवगत केले की, विद्यापीठाने 'Center of Excellence in Meritime Studies' सुरु केले आहे व त्यामध्ये M.A/ M.Com/ M.Sc in Maritime Studies हे अभ्यासक्रम चालविले जातात. मात्र काही तज्ञांशी चर्चा केल्यावर असे निदर्शनास आले की, Meritime अभ्यास हा Marine अभ्यासक्रमाचाच एक भाग आहे, त्यामुळे मा. कुलगुरुंनी असे सुचविले की, यापुढे या केंद्राचे नाव "Center of Excellence in Marine | |

| | | |
|---|---|---|
| | Studies" असे करावे आणि M.Sc in Marine Science असा बदल करावा, M.A. आणि M.Com in Meritime Studies या अभ्यासक्रमांची नावे तीच राहतील. सदर बदल विद्यापरिषदेने मान्य केला असून आता व्यवस्थापन परिषदेने मान्य करावा.<br>सर्व सभासदांनी या बदलास एकमताने मंजूरी दिली. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सहायक कुलसचिव

उपकुलसचिव

कुलसचिव

प्र-कुलगुरू

इतिवृत्त मंजूर

कुलगुरू